


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक १९८ •शुक्रवार, दि.१७ ऑक्टोबर २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955

# शिदेंचे वर्चस्व कमी करण्यासाठी फडणवीसांनी डाव रचला

## नमो नावाच्या १० योजना बंद

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील सत्ताधारी महायुतीमधील अंतर्गत तणाव पुन्हा एकदा उघड झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने, विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुरू केलेल्या अनेक योजनांवर बंदी आणल्याचा खळबळजनक दावा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार आणि नेते अंबादास दानवे यांनी केला आहे.

विशेषतः, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावाने 'नमो' शिर्षकाखाली सुरू असलेल्या तब्बल १० महत्त्वाकांक्षी योजना बंद केल्याने राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे. दानवे यांनी या निर्णयावर थेट 'दैवत बदलण्याच्या' अटीवर चिन्ह आणि नाव मिळाल्याची बोचरी टीका करत शिंदे गटाला लक्ष्य केले आहे.

'नमो' नावाच्या १० योजनांवर बंदीची कुऱ्हाड: अंबादास दानवे यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्य सरकारने १७ सप्टेंबर २०२३ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घोषित केलेल्या 'नमो' नावाने सुरू होणाऱ्या दहा योजना बंद केल्या आहेत. या योजनांमध्ये खालील प्रमुख योजनांचा समावेश

**• अंबादास दानवे यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्य सरकारने १७ सप्टेंबर २०२३ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घोषित केलेल्या 'नमो' नावाने सुरू होणाऱ्या दहा योजना बंद केल्या आहेत.**

आहे, ज्या शिंदे यांनी 'मोदी' ब्रँड वापरून राज्यात मोठा प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता: नमो महिला सशक्तीकरण योजना, नमो कामगार कल्याण योजना, नमो शेततळे अभियान, नमो गरीब व मागासवर्गीय सन्मान योजना, नमो ग्राम सचिवालय योजना, नमो आदिवासी स्मार्ट शाळा योजना, नमो दिव्यांग शक्ती योजना, नमो क्रीडा मैदान व उद्यान योजना, नमो शहर सौंदर्यीकरण योजना, नमो तीर्थस्थळ व गडकिल्ले संवर्धन योजना. या दहा योजना एकाच वेळी ▶▶ उर्वरित पान २ वर




## नाथापुरात शेतकऱ्याची आत्महत्या

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील नाथापूर येथील बाबुराव लक्ष्मण चव्हाण वय ५२ वर्ष यांनी काल मराठा आरक्षणाच्या निराशातून व शेती नापीकतेला कंटाळून गळफास घेऊन शेतात आत्महत्या केली एक मुलगा कंपनीत नोकरी करतो तर दुसरा मुलगा बीएड झालेला आहे नोकरीस पैसे भरू शकत नाही आणि आरक्षण काही मिळत नाही असे दोन्ही बाजू च्या संकटात सापडल्याने दिसून आल्याकारणाने त्यांनी



आत्महत्या केली असून यावर्षी तर सर्व शेतीतील पीक अतिवृष्टीमुळे बाधित झाले आहे त्यांना पत्नी दोन मुलं एक मुलगी आहे गावकऱ्यांनी खूपच हळहळ व्यक्त केली आहे .

## बीड जिल्ह्यातील अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांना 577 कोटी रुपयाचे पॅकेज

### आ. विजयसिंह पंडित यांनी मानले उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे आभार

**गेवराई । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्याचे प्रचंड नुकसान झाले होते. महाराष्ट्र शासनाने बीड जिल्ह्यातील अतिवृष्टीत बाधित शेतकऱ्यांसाठी ५७७ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले असून शेतकऱ्यांना अतिवृष्टी व पुरामुळे झालेली नुकसान भरपाई मिळावी म्हणून सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे आभार मानले



आहेत. अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांना दिवाळीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने पॅकेज जाहीर करून दिवाळी भेट दिली असून दोन दिवसात शेतकऱ्यांच्या बँक खात्यात पैसे जमा होणार असून सणासुदीच्या काळात शेतकऱ्यांना आधार मिळणार आहे. ज्या शेतकऱ्यांकडे फार्मर आयडी नाहीत त्यांनी दोन दिवसात ईकेवायसी करुन घ्यावी असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे. बीड जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले होते. ▶▶ उर्वरित पान २ वर

## चकलांबा पोलिसांनी पकडले वाळू वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर ;१४ लाख १० हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त



**चकलांबा । प्रतिनिधी**

पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी जिल्ह्यात अवैध धंद्यावर कठोर कारवायाच्या दिलेल्या सुचनेनुसार चकलांबा पोलिसांच्या वतीने कारवाईचा धडाका लावला आहे. मौजे राक्षसभूवन येथे गोदावरी नदी पात्रात वाळू ची अवैध चोरी करणारे दोन ट्रॅक्टर सपोनि संदीप पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी ताब्यात घेण्यात आले. या कारवाईत १४ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त ▶▶ उर्वरित पान २ वर



*देशाचे पंतप्रधान नरेंद्र जी मोदी साहेब आणि आंध्र प्रदेश चे मुख्यमंत्री चंद्रबाबू नायडू यांनी श्रीशैलम या ठिकाणी शिवाजी महाराज मंदिरास भेट दिली त्यांच्याबरोबर आपले डॉक्टर भवंतरावजी आणि शिवाजी महाराज मार्ग भवन चे ऑर्गनायझर सेक्रेटरी नागेश्वरजी बरोबर होते*

## 10 लाख रुपयांची लाच घेताना

### जालना महापालिका आयुक्त सापळयात अडकले

**जालना । प्रतिनिधी**

जालना महानगरपालिकेचे पहिले आयुक्त म्हणून कारभार पाहात असलेले संतोष खांडेकर हे १० लाख रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सापळ्यात अडकले. मनपा आयुक्तांच्या शासकीय निवासस्थानी गुरुवारी सायंकाळी ही कारवाई करण्यात आल्याची माहिती आहे. या प्रकरणी छत्रपती संभाजीनगर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधीक्षक माधुरी केदार कांगणे यांना विचारले असता त्यांनी सदरची कार्यवाही सुरू असल्याची माहिती दिली. तक्रारदार बांधकाम कंत्राटदाराकडून केलेल्या कामाचे देयक काढण्यासाठी मनपा आयुक्त संतोष खांडेकर यांनी मोठी रक्कम लाच म्हणून मागितली. त्यातील १० लाख रुपयांवर तडजोड झाली. त्या संदर्भातील तक्रार नोंद ▶▶ उर्वरित पान २ वर



## क्षीरसागर मुक्त नगरपालिका करणार नवनाथ अण्णा शिराळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरामध्ये सध्या नगरपालिकेचे राजकारण तापत असून याच पार्श्वभूमीवर गेल्या ३५ वर्षांमध्ये क्षीरसागर यांनी बीड शहराचा कुठला विकास न करता सर्व भकास केलेला आहे कारण बीड शहराला पाणीदेखील देण्यामध्ये क्षीरसागर कमी पडले आहेत पंधरा ते वीस दिवसाला बीड शहरवासी यांना पाणी मिळते ते देखील अशुद्ध पाणी काही ठिकाणी पाण्यामध्ये कुत्रे मेलेले



आढळतात यामुळे माणसाचे आरोग देखील धोक्यात आलेले आहे याच अनुषंगाने बीड शहरातील बीड परिसरातील सर्व नागरिक नाराज असल्यामुळे त्यांना आता ही नगरपालिका निवडणूक लढवण्याचा कुठलाच नैतिकतेचा अधिकार क्षीरसागर यांना नसल्याचे भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेत माजी सभापती नवनाथ आण्णा शिरोळे पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून सर्व बीड शहरातील जनतेला आवाहन केले आहे की आपण बीड शहराला भकास करणाऱ्या लोकांना कुठलेच मतदान रुपी ▶▶ उर्वरित पान २ वर

## ॲड. मंदा नामदेवराव संकपाळे या बीड नगर अध्यक्ष पदाची निवडणूक लढवणार व बीड शहरवासीयांना न्याय मिळवून देणार

**बीड । प्रतिनिधी**

एडवोकेट मंदा नामदेवराव सकपांळे या बीड तालुक्यातील व बीड शहरातील सर्व गोरगरीब जनतेच्या अडीअडचणी जाणून



घेऊन २०१० पासून आतापर्यंत शेकडो निराधार महिलांना त्यांनी संजय गांधी निराधार योजनेचा शासनाचा लाभ मिळवून दिलेला आहे तसेच अनेक बिन शहरातील बीड तालुक्यातील दिव्यांग व्यक्ती यांना देखील त्यांनी शासनाच्या विविध योजनेचा लाभ मिळवून दिलेला आहे व त्यांचे सुखदुःख तळमळीने व निस्वार्थीपणाने धावून जाणाऱ्या व्यक्तिमत्व असलेल्या एडवोकेट मंदा मॅडम संकपाळे आहेत तसेच त्यांचे सामाजिक कार्यामध्ये देखील खूप मोठा सहभाग आहे हो बीड शहरातील बीड जिल्ह्यातील राजकीय▶▶ उर्वरित पान २ वर

## झमझम कॉलनी येथे गुटखा माफियावर गुटखा जप्त करून केली कडक कारवाई

**• स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी**

**पत्र्याच्या शेडवर छापा टाकुन २,४१,८७५ रूपयाचा गोवा गुटखा जप्त)**

**बीड । प्रतिनिधी**

मा. पोलीस अधीक्षक साहेब, बीड यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्याचे समूळ उच्चटन करणे बाबतचे आदेश दिलेले आहेत. त्यावरुन पोलीस निरीक्षक स्था.गु.शा., बीड यांना गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, झमझम कॉलनी बीड येथील एका पत्र्याच्या शेडमध्ये बेकायदेशिररित्या गोवा



गुटखा विक्री करण्यासाठी साठवुन ठेवलेला आहे. मा. पोलीस अधीक्षक सो बीड श्री. नवनीत काँवत सो, मा. अप्पर पोलीस अधीक्षक बीड श्री सचिन पांडकर सो, यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, सह पोह/८३७ गोविंद राख, पोह/१३३० बागवान, १६२६ राहुल शिंदे, १८५६ अंकुश वरपे, ४०२ आनंद मस्के, मपोह/१७०५, स्वाती मुंडे, पोअ.२३१० बबन सलगर, १८९६ अलीम शेख, चालक पोअ/१९३५ सुनिल राठोड सर्व नेमणुक स्थागुशा बीड ▶▶ उर्वरित पान २ वर

## रिक्षात विसरलेला मोबाईल ट्रॉफिक पोलिसांच्या माध्यमातून महिलेला परत

**बीड । प्रतिनिधी**

ऑटो रिक्षामध्ये प्रवाशाचा विसरून राहिलेला मोबाईल ऑटो चालकाने जवळ असलेल्या टॉपिक पोलिसांच्या स्वाधीन केला. तसे ट्राफिक पोलिसांनी मोबाईल धारकाचा नंबर काढून फोन केला. लागलीच सदर मोबाईल धारक महिला ट्राफिक पोलीस चौकी येथे येताच तिचा हरवलेला मोबाईल ट्राफिक पोलिसांनी तिच्या स्वाधीन केला. यामुळे या महिलेने पोलीस बांधवांचे सहकार्य, रिक्षा ▶▶ उर्वरित पान २ वर




## बीड नगरअध्यक्ष पदासाठी नवीन चेहऱ्याला मिळणार संधी डॉ. क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

नगरपरिषदेचे अध्यक्षपद अनुसूचित जातीतील महिलेसाठी आरक्षित असल्याने आता नव्या महिला नेतृत्वाला संधी मिळणार आहे. ज्यांना पूर्वी संधी मिळाली नाही, त्यांचाही विचार केला जाईल. तसेच, ५० टक्के प्रतिनिधित्व तरुणांना दिले जाईल. गेली ३० वर्ष बीडकरांनी डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवला आहे. ही विजयाची परंपरा पुढेही कायम राहणार आहे, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा



अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केला आहे. आगामी नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या उपस्थितीत बीडमध्ये सौ. के.एस.के. महाविद्यालयाच्या सभागृहात गुरुवारी ▶▶ उर्वरित पान २ वर

**कार्यकर्त्यांसाठी पूर्ण ताकदीने निवडणूक लढविणार : डॉ.सारिकाताई क्षीरसागर**

**डॉ.सारिकाताई क्षीरसागर मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या, डॉ.योगेश क्षीरसागर हे सर्वसमावेशक नेतृत्व आहे. त्यांचा शांत स्वभाव आहे, याचा अर्थ आम्ही कमजोर नाहीत. डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांनी बीड शहराचा विकास केला आहे. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून डॉ.योगेश हे राजकारणात पुढे जात आहेत. त्यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन सोबत असलेल्या निष्ठावंत, विकासाभिमुख उमेदवारांना नगरपरिषदेत संधी दिली जाणार आहे. आता महिलांनी नेतृत्व करण्यासाठी सज्ज रहावे. आम्ही निवडणूक लढविणार की नाही, याबाबत निर्णय नाही. परंतु कार्यकर्त्यांसाठी मात्र पूर्ण ताकदीने निवडणूक लढविणार आहोत. शहरात वॉर्ड ५२ की ५० हे विरोधकांना ठाऊक नाही. त्यांनी शहरात नेमका विकास कुठे केला ? हे दाखवून द्यावे, असा टोला विरोधकांना लगावला.**



# गोरक्षणाचे महत्व सांगणारी 'वसुबारस'

दिपावलीतील पाहिला सण 'वसुबारस'. आश्विन कृष्ण द्वादशीस हा सण साजरा केला जातो. या दिवशी गोधनाची पूजा केली जाते. समुद्रमंथनातून पाच कामधेनू उत्पन्न झाल्या होत्या त्यापैकी नंदा नामक धेनूस उद्देशून हे व्रत केले जाते. अनेक जन्माच्या कामना पूर्ण व्हाव्यात याकरिता वासरासहित गायीची या दिवशी पूजा केली जाते. भारत हा पूर्वीपासून कृषिप्रधान देश असल्याने गोपालनाचे महत्व लोकांवर आधीपासूनच बिंबले आहे. गाईच्या पोटात ३३ कोटी देव असतात असे लहानपणी सांगितले जाई. त्यामुळे गाय दिसली की तिच्या उदराला स्पर्श करून नमस्कार करण्याचा संस्कारच मुलांवर झालेला असे. गाय आणि तिच्या वासरांना कुटुंबातील सदस्याप्रमाणे वागणूक दिली जाई. आज मात्र परिस्थिती बदलली आहे. गेल्या काही वर्षांत देशी गाईंच्या संख्येत कमालीची घट झाली आहे. धनाची निकड भागवण्यासाठी शेतकरी गोधन कसायाला विकू लागला आहे. सरकारने गाईंच्या सन्मानार्थ तिला राज्यमातेचा दर्जा तर दिला आहे; मात्र तिच्या रक्षणासाठी आणि संवर्धनासाठी कोणतेही ठोस धोरण आखलेले नाही परिणामी राज्यात गाईंची संख्या प्रतिदिन घटतच आहे. कोणतेही शुभकार्य असो किंवा धार्मिक पूजाविधी असो गोग्रास दिल्याशिवाय ते पूर्ण होतच नाही. स्थानाची आणि वास्तूची शुद्धी करण्यासाठी गोमूत्र शिंपडले जाते. यज्ञादी विधीच्या ठिकाणी सात्विकता निर्माण व्हावी यासाठी तेथील भूमी गाईच्या शेणाने सारवली जाते. गोमातेच्या दुधाला तर अमृताची उपमा दिली जाते. लहान बाळाला आई नंतर पहिले दूध गाईचेच दिले जाते. गायीच्या दुधाचे महत्व शास्त्रज्ञांनीही मान्य केले आहे. गाईच्या दुधापासून अनेक दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती केली जाते ज्यातून गोपालन करणाऱ्याला वर्षभर उत्पन्न मिळते. देशी गाईचे तूप हे अनेक आजारांवर अत्यंत गुणकारी मानले जाते. गाय ही भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे त्यामुळे ती उपयुक्त आणि श्रद्धेय का आहे याचा उल्लेख प्राचीन धर्मग्रंथांत आढळतो. वसिष्ठ ऋषींनी गोमातेवर संशोधन करू गाईच्या अनेक प्रजाती निर्माण केल्या. गोपालनाचे महत्व साक्षात भगवान श्रीकृष्णाने स्वतः गोपालन करून दर्शवले आहे, दत्तगुरुंनीही गोमातेची महती वर्णिली आहे. छत्रपती शिवरायांनी गोहत्येसाठी सरसावणारे




कसायाचे हात जागेवर कलम करून गोरक्षणाचे महत्व रयतेवर बिंबवले होते. महाराजांनी हिंदवी स्वराज्यात गोपालनाला विशेष महत्व दिले. त्यामुळेच महाराजांना गोब्राह्मण प्रतिपालक म्हटले जाते. पंजाब केसरी महाराजा रणजीत सिंह यांनी त्यांच्या कारकिर्दीत राज्यात गोहत्या करणाऱ्याला मृत्युदंडाच्या शिक्षेचे प्रावधान केले होते. रामचंद्र बीर यांनी गोहत्या थांबवण्यासाठी ७० दिवस उपवास केला होता. हिंदुत्वनिष्ठ संघटना आणि अध्यात्मिक संप्रदाय यांनी केलेल्या अथक पाठपुराव्यानंतर राज्यात गोवंश हत्याबंदी विधयेक आणण्यात आले; मात्र आजमितीला त्याच्या अंमलबजावणीमध्ये कमालीची ढिलाई दिसून येत आहे. तुळशी वृन्दावनाला प्रदक्षिणा घातल्यावर ज्याप्रमाणे शरिरात साकारात्मक ऊर्जा तयार होते त्याप्राणे गाईला प्रदक्षिणा घातल्या तरी आपल्या शरीरारात तेव्हढ्याच प्रमाणात सकारात्मक ऊर्जा तयार होत असल्याचे युनिव्हर्सल स्कॅनर मापन यंत्राद्वारे करण्यात आलेल्या परीक्षणातून सिद्ध झाले आहे. ज्या भागात अधिक प्रमाणात गोहत्या होतात त्या भागात भूकंप होतात असे एका निरीक्षणातून सिद्ध झाले आहे. गाईला पृथ्वीचे चुंबकीय क्षेत्र जाणवते त्यामुळे चरताना आणि विश्रांती घेत असताना गाय नेहमी दक्षिणोत्तर असते. नवजात गोवंशाच्या आवाजाच्या ऐकण्यामुळे मानसिक आजारांमध्ये सकारात्मक बदल होत असल्याचेही प्रयोगातुन सिद्ध झाले आहे. गाईच्या पाठीच्या कण्यातील सूर्यकेतु मज्ञातंतू हानिकारक किरणोत्सर्गाला रोखून पर्यावरण स्वच्छ ठेवते. अशा कितीतरी प्रयोगांतून देशी गाईची उपयुक्तता सिद्ध झाली आहे.

– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई

◆ पान १ वरून पुढे...

## शिंदेंचे वर्चस्व...

'नमो' नावाच्या एवढ्या मोठ्या योजनांना स्थगिती दिल्याने, 'शिंदे गट' भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये केवळ नावापुरता आहे की काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

दानवेंची बोचरी टीका: 'दैवत बदलण्याची अट'– या योजना बंद करण्याच्या निर्णयामुळे अंबादास दानवे यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर अत्यंत कठोर शब्दांत टीकास्त्र सोडले आहे. दानवे यांच्या मते, शिंदे गटाला 'महाशक्ती'ने अर्थात भाजपने बहुदा दैवत आणि देवघर बदलण्याच्याच अटींवर चिन्ह आणि नाव दिले होते.

आर्थिक भार की राजकीय वर्चस्वाची लढाई? माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केलेल्या काही योजना यापूर्वीच बंद करण्यात आल्या आहेत, ज्यात 'आनंदाचा शिधा' यासह इतर योजनांचा समावेश आहे. मुख्यमंत्री 'माझी लाडकी बहीण योजना'मुळे सरकारच्या तिजोरीवर आलेल्या आर्थिक भारामुळे या योजना बंद केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. मात्र, 'नमो' योजना बंद करण्याच्या निर्णयामागे केवळ आर्थिक कारण आहे की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने 'शिंदे मॉडेल'ला राज्यात वर्चस्व मिळू नये यासाठी राजकीय धोरण म्हणून हे निर्णय घेतले, अशी शंका उपस्थित होत आहे. हा निर्णय महायुतीमधील 'देवेंद्र फडणवीस विरुद्ध एकनाथ शिंदे' या राजकीय वर्चस्वाच्या लढाईचा भाग असल्याचे मानले जात आहे.

## बीड जिल्ह्यातील....

विशेषत: गेवराई तालुक्यात गोदावरी आणि सिंदफना नदीमध्ये आलेल्या पुरामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेल्या होत्या तर अतिवृष्टीमुळे शेतमालाचे प्रचंड नुकसान झाले होते. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी बीड जिल्ह्याचा दौरा करुन शेतकऱ्यांचे अश्रू पुसले होते. यावेळी गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा करुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, एकनाथ शिंदे यांच्यासमोर सर्व परिस्थिती गंभीरतेने मांडली होती, त्या पार्श्वभूमीवर आज महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय जारी करुन अतिवृष्टी बाधित बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी ५७७ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले असून आ.विजयसिंह पंडित यांनी अर्थमंत्री अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी आर्थिक पॅकेज जाहीर करून दिवाळीची भेट दिली असून दोन दिवसात शेतकऱ्यांच्या बँक खात्यात पैसे जमा होणार असून सणासुदीच्या काळात शेतकऱ्यांना आधार मिळणार आहे. ज्या शेतकऱ्यांकडे फार्मर आयडी नाहीत त्यांनी दोन दिवसात ईकेवायसी करुन घ्यावी असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे.

◆ पान १ वरून पुढे...

## चकलांबा पोलिसांनी...

करण्यात आला. दिनांक १६.१०.२०२५ रोजी ०२.०० वाजता गोपनीय माहिती मिळाल्यावरून सापळा रचून पोलिसांनी गोदावरी नदी पात्रामध्ये दोन ट्रॅक्टर ताब्यात घेतले. यावेळी ट्रॅक्टरमध्ये वाळूची चोरट्या मार्गाने तस्करी करण्यात येतं असल्याचे समोर आले असून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधिक्षक नवनीत कॉंवत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, पोलीस उपाधीक्षक श्री. कटके यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संदीप पाटील, रीळ चांदमारे पोह/ पवार, ,प्रशांत घोंगडे, विनोद सुरवसे यांनी केली.

## 10 लाख...

झाल्यानंतर खांडेकर १० लाख घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने लावलेल्या सापळ्यात अडकले. जालना महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांच्या अटकेनंतर जालन्यात कंत्राटदारांनी जालना एसीबी कार्यालयाबाहेर फटाके फोडून आपला रोष व्यक्त केला. जालना महानगरपालिका आयुक्त संतोष खांडेकर यांनी बांधकामाचे बिल देण्यासाठी तक्रारदाराकडून दहा लाखाची लाच मागितली होती, यावेळी जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने खांडेकर यांच्या शासकीय निवासस्थानी सापळा रचून ही लाच स्वीकारताना त्यांना रंगेहात अटक केलं. यानंतर काही कंत्राटदारांनी एसीबी कार्यालयासमोर फटाके फोडून आपला रोष व्यक्त केला, तसेच एसीबी अधिकाऱ्यांचे आभार मानले.

## क्षीरसागर मुक्त...

आशीर्वाद देऊ नका त्यांना दारातही उभे करू नका त्यांना कुठलाच थारा देऊ नका आणि यांना यांची जागा दाखवा असे आव्हान नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी सर्व बीड शहरातील तमाम मतदार बंधू आणि भगिनी यांना केले आहे तसेच भारतीय जनता पार्टीच्या नेत्या तथा महाराष्ट्राच्या मंत्री आदरणीय पंकजाताई मुंडे व माजी खासदार प्रीतम ताई मुंडे या भगिनी ज्या उमेदवार देतील तो उमेदवार आम्ही मोठ्या ताकतीने निवडून आणू आणि बीड नगरपालिका सर्व ताकद लावून क्षीरसागर मुक्त करु व सर्व बीड शहरातील जनतेची सेवा भारतीय जनता पार्टीने दिलेला नगर अध्यक्षपदाचा उमेदवार निवडून आणून व सर्व नगरसेवक निवडून आणून दिलेले हे येणाऱ्या भविष्यकाळात बीड शहरातील सर्व नागरिकांची सेवा करतील असे असे मनोगत नवनाथ अण्णा शिराळे यांनी प्रसिद्धी माध्यमासी बोलताना थोडक्यात विचार व्यक्त केले आता पंकजाताई यांच्या आदेशाची आम्ही वाट पाहत आहोत की ताई कोणता उमेदवार देतात तो उमेदवार आम्ही पूर्ण ताकतीने निवडून आणणार व बीड नगरपालिका ही कायमची शिरसागर मुक्त करणार

## ॲड. मंदा नामदेवराव...

◆ पान १ वरून पुढे...

नेतेमंडळी यांच्याशी देखील त्यांचा चांगला सुसंवाद सामाजिक कार्याच्या माध्यमातून होत असतो म्हणून त्यांची एक आगळी वेगळी ओळख देखील त्यांनी वकीलक्षेत्रामध्ये उत्कृष्ट कार्य करत असताना त्यांनी राजकीय क्षेत्रामध्ये देखील निर्माण केलेली आहे त्या सर्वांशी मन मोकळ्या बोलत असतात व आत्मीयतेने बोलणाऱ्या तसेच शेकडो पेक्षा जास्त गोरगरीब दिन दुबळ्या शोषित वंचित नागरिकांना संजय गांधी ,श्रावण बाळ, इमारत बांधकाम मजूर पेन्शन योजना अशा विविध प्रशासकीय व शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी गेली १८ वर्षापासून सातत्याने शासन प्रशासन दरबारी पाठपुरावा करून न्याय मिळवून देणाऱ्या व सातत्याने शासनाच्या माध्यमातून गोरगरीब लोकांच्या हितासाठी असणाऱ्या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी झटणाऱ्या अशा समाजाच्या व जनतेच्या संपर्कात असणाऱ्या व्यक्तिमत्वाला येणाऱ्या नगरपरिषद निवडणुकीत नगराध्यक्ष पदाकरिता प्रमुख राजकीय पक्षांनी उमेदवारी देऊन संधी द्यावी या व्यक्तिमत्त्वाला उमेदवारी दिल्यास समाज मनाचा आरसा असणाऱ्या उमेदवारास पाठबळ मिळून गरजू गोरगरिब वंचित जनतेचे प्रश्न तात्काळ मार्गी लागतील व बीड शहरातील अनेक गोरं गरीब लोकांची सामाजिक व आर्थिक प्रगती होण्यासाठी नक्कीच मदत होईल असे देखील बीड शहरातील नागरिकांमधून बोलले जात आहे.

## झमझम कॉलनी...

असेनी मिळून मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी जाऊन दि.१६.१०.२०२५ रोजी १६.५० वाचे सुमारास छापा मारला असता. सदर ठिकाणी आरोपी नामे सय्यद रहेमतउल्ला सय्यद रजाउल्लाह इनामदार वय ४६ वर्षे रा. झमझम कॉलनी बोड हा त्याच्या आर्थिक फायद्याकरीता आरोपी नामे सय्यद अजमदउल्ला सय्यद रजाउल्लाह यांचे सागणेवरून पत्र्याच्या शेडमध्ये पांढ-या रंगाच्या १५ गोण्यामध्ये गोवा गुटखा किमंती अंदाजे २,४१,८७५/-रूपयाचा माल विक्री करण्यासाठी साठवून ठेवत असतांना मिळुन आला. म्हणुन दोन्ही आरोपी विरूध्द पोस्टे बीड शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. सदरची कामगिरी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे.

## रिक्षात विसरलेला...

चालकाचा प्रामाणिकपणा आणि माझा कष्टाच्या पैशातून घेतलेला मोबाईल या संगमामुळे मला तो परत मिळाला असे म्हणून सवारचे उपकार मानले. यासंदर्भात माहिती अशी की निपाणी जवळका येथील अश्विनी रविदास काकडे ह्या बुधवार रोजी सकाळी रिक्षातून प्रवास करीत असताना बीड बस स्थानकाच्या समोर ऑटो मधून उतरल्या उतरता वेळी त्यांचा मोबाईल ऑटो रिक्षा तसाच विसरून राहिला. यावेळी तेथे ड्युटीवर असलेले पोलीस हवालदार आदिनाथ बांगर यांनी रिक्षा का उभा केला म्हणून या रिक्षाचालकाला हटकले. तेव्हा त्याने प्रवासी महिलेचा मोबाईल

◆ पान १ वरून पुढे...

विसरून राहिला असे सांगितले व आपण तो तिला परत करावा अशी विनंती करून मोबाईल बांगर यांच्या स्वाधीन केला. लागलीस बांगर यांनी मोबाईल मधून महिलेचा नंबर काढून मग संपर्क केला असता अश्विनी काकडे या पोलीस चौकी येथे आल्या त्यांना लागलीच पोलीस हवालदार आदिनाथ बांगर, पोलीस हवालदार त्र्यंबक कुडके यांनी लिव्हो कंपनीचा २० हजार रुपये किमतीचा मोबाईल परत केला. याबद्दल या महिलेने वरील प्रमाणे मत व्ये करून पोलिस आणि अज्ञात रिक्षावाल्याचे आभार मानले.

## बीड नगरअध्यक्ष....

(दि.१६) बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते. यावेळी डॉ.सारिकाताई क्षीरसागर, माजी नगरसेवक किशोर काळे, गणेश वाघमारे, भास्कर जाधव, नरसिंग नाईकवाडे, शिवाजी जाधव, संजय होळकर, शुभम धूत, अशोक वाघमारे, विकास जोगदंड, प्रकाश कानगावकर, प्रेम चांदणे, रवी जवेरी, राहुल गुरखुदे, बाळासाहेब जाधव, सुभाष सपकाळ, संगीता वाघमारे, शालिनी परदेशी, मुस्तफा भाई, नशीर अन्सारी, बाळासाहेब आंबेकर, महेश गर्जे, अमोल पवळ, साउद भाई, सतीश पवार, नबील जमा, बाळासाहेब गुंजाळ, दत्ता जाधव, संभाजी दुधाळ, रवींद्र कदम, जुनेद जहागिरदार, अशोक शेजवळ, बाबू अत्तार, मुजीब एवन, गुड्डू चाऊस, बिलाल, असरार, पिंटू माने, खमर, द्वारकादास फटाले यांच्यासह राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, नगरपरिषद निवडणूक ही आपल्यासाठी नवी नाही. परिस्थिती काहीही असो, शहरातील जनता आपल्या सोबत उभी आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार हे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या बीड नगरपरिषद निवडणुकीत मी माझ्या विधानसभा निवडणुकीपेक्षा अधिक ताकद लावणार आहे. कायम निष्ठेने सोबत असलेल्या कार्यकर्त्यांनाच पक्षाकडून संधी दिली जाणार आहे. परंतु आपण उभे केलेले काही लोक आज पक्षातील नेत्यांकडेच आपली तक्रार करत आहेत, ही खेदजनक बाब आहे. प्रत्येकाने आपापले घर मजबूत करावे, इतरांकडे पाहू नये. ज्यांना आजपर्यंत स्वतःची नगरपरिषद ताब्यात घेता आली नाही, ते बीडमध्ये येऊन काय करणार? असा टोला त्यांनी लगावला. ते पुढे म्हणाले, नव्या-जुन्या कार्यकर्त्यांची सांगड घालून आपण निवडणुकीला सामोरे जाणार आहोत. अजितदादांनी बीड शहरासाठी सर्वाधिक निधी दिला आहे. सीट्रिपलआयटी, शासकीय इमारती, नदी सुशोभीकरण, डीपी रस्ते यांसारखे महत्वाचे विकास प्रकल्प हाती घेतले आहेत. अनेक प्रस्तावांवर बसून चर्चा करून निधी मिळवला, परंतु त्याचे श्रेय आमदार घेत आहेत. आमदारांचा फंड नेमका कुठे गेला याबाबत मात्र कोणी बोलत नाही. माजी आमदारांच्या कामांचे बोर्ड दिसतात; मात्र निधी कोणत्या कामावर खर्च झाला याचा हिशोब कोणी देत नाही, असेही त्यांनी नमूद केले. बीडच्या विकासासाठी नगरपरिषद निवडणूक आपल्या ताब्यात येणे आवश्यक आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## अखेर भीती...

घेतली नाही. परिणामी आज एका कुटुंबाचा संसार उद्ध्वस्त झाला आहे. स्थानिक नागरिकांमध्ये आता तीव्र संतापाची लाट आहे. फक्त निवडणुकीच्या काळात या रस्त्याच्या डांबरीकरणाची आश्वासने देणारे आमदार आणि खासदार आता कुठे आहेत? झालेल्या मृत्यूची जबाबदारी कोण घेणार? असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. रस्त्याच्या दुरुस्तीसाठी शेतकरी आणि युवकांनी अनेक वेळा लेखी मागण्या केल्या होत्या, पण सार्वजनिक बांधकाम विभागाकडूनही काहीच हालचाल झाली नाही. घटनेनंतर संतप्त नागरिकांनी सोमवारी सकाळी या रस्त्यावर आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. प्रशासनाने तात्काळ लक्ष न दिल्यास पुढील काळात मोठे आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे. दरम्यान, मृत तरुणाच्या कुटुंबीयांवर शोककळा पसरली असून गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## जिल्हाधिकारी विवेक...

घराच्या अंगणात किंवा सोसायटी परिसरात गड-दुर्गांच्या प्रतिकृती साकारून दुर्गोत्सवात सहभागी व्हावे.यामधून शिवचरित्राचा अभिमान प्रत्येकाच्या मनात सखोलपणे रुजेल. या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्वांना मुख्यमंत्री महोदयांच्या स्वाक्षरीचे अभिनंदनपत्र पाठवण्यात येईल. तसेच अमृत विद्या या डिजिटल लर्निंग प्लॅटफॉर्मवरील शिवछत्रपतींचा गौरवशाली इतिहास आणि आजच्या काळातील प्रेरणा या विषयावरील रु. ९९९/- किंमतीचे ऑनलाइन प्रशिक्षण सर्व सहभागींसाठी निशुल्क उपलब्ध करून दिले जाणार आहे. १२ गड-दुर्गांची यादी : रायगड,राजगड,प्रताप गड,सिंधुदुर्ग,साल्हेरदुर्ग,खांदेरीचा दुर्ग,जिंजी,पन्हाळगड,शिवनेरी,विजयदुर्ग,लोहगड आणि पद्मदुर्ग (सुवर्णदुर्ग).गड-दुर्ग हे आपल्या स्वाभिमानाचे प्रतीक आहेत. प्रत्येक कुटुंबाने या उपक्रमात सहभागी होऊन शिवरायांना अनोखी मानवंदना द्यावी, असे प्रतिपादन अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी केले आहे.

## जिल्ह्यामध्ये मनाई....

परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे. शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये. जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्ल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

◆ पान ४ वरून पुढे...

## लाखो ओबीसी....

दि. १७ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी चार वाजता छत्रपती संभाजी राजे क्रीडा संकुलाच्या प्रांगणात होणाऱ्या ओबीसी महाएल्गार सभेसाठी राज्यातून लाखो ओबीसी समाज बांधव उपस्थित राहणार आहेत. या ऐतिहासिक सभेचे साक्षीदार होण्यासाठी ओबीसी समाजातील बंधू-भगिनी, युवक, युवती, विद्यार्थी, समता सैनिक आणि कार्यकर्त्यांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ड. सुभाष राऊत यांनी केले आहे. ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नावर देशाचे राष्ट्रीय ओबीसी नेते ना. छगनराव भुजबळ आणि माजी मंत्री आ. धनंजय मुंडे पहिल्यांदाच एका व्यासपीठावर येत असल्याने या सभेकडे राज्याचे लक्ष लागलेले आहे. महाराष्ट्र सरकारने २ सप्टेंबर २०२५ रोजी मराठा आरक्षणासाठी हैदराबाद गॅझेटियरचा काढलेला जीआर तात्काळ रद्द करावा या सभेतील प्रमुख मागणी असून देशाचे ओबीसी नेते या व्यासपीठावरून सरकारला कोणता इशारा देणार? याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे. ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते ना. छगनराव भुजबळ यांच्या उपस्थितीत शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ४ : ०० वाजता बीड येथे ओबीसी महाएल्गार सभेचे आयोजन समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून या सभेला जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे, माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर, धनगर समाजाचे नेते प्रकाश शेंडगे, आ. गोपीचंद पडळकर, मुस्लिम समाजाचे नेते शब्बीर अन्सारी, प्रा. लक्ष्मण हाके, ज्येष्ठ साहित्यिक तथा भटक्या विमुक्त समाजाचे नेते लक्ष्मणराव गायकवाड, शिवा संघटनेचे संस्थापक प्रा. मनोहर धोंडे, सयाजी झुंजार, राजाराम पाटील, नवनाथ वाघमारे, ॲड. मंगेश

◆ पान ४ वरून पुढे...

ससाने, वंजारी समाजाचे नेते सत्संग मुंडे, ईश्वर बाळबुधे आदींची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. ओबीसी समाजाच्या येणाऱ्या अनेक पिढ्यांच्या भवितव्यासाठी हे आरक्षण टिकवणे गरजेचे आहे. संविधानाने ओबीसींना दिलेलं आरक्षणाचे सुरक्षा कवच कोणी झुंडशाहीच्या जोरावर हिसकावून घेण्याचा प्रयत्न करत असेल तर त्यांचा प्रत्येक डाव हाणून पाडला जाईल, याच भूमिकेतून बीड येथे ओबीसींची महाएल्गार सभा आयोजित करण्यात आलेली आहे. ओबीसी प्रवर्गाचे आरक्षण वाचविणे हि सर्व जाती बांधवांची जबाबदारी आहे.

## ओबीसी समाज...

गेवराई तालुक्यातील ओबीसी, भटके विमुक्त, मुस्लिम ओबीसी, दलित समाज बांधव यांनी कंबर कसली आहे. शासनाने दि.०२ सप्टेंबर रोजी काढलेला काळा जीआर रद्द करून बारा बलुतेदार व आठरा आलुतेदार प्रवर्गातील मुळ ओबीसी समाजाचे आरक्षण अबाधित ठेवण्यासाठी आज ना.भुजबळ साहेबांच्या प्रमुख उपस्थितीत बीड येथे ओबीसी महाएल्गार सभा होणार आहे. सर्व प्रवर्गातील ओबीसी समाज बांधवांनी आज होणाऱ्या या सभेला गेवराई तालुक्यातील ओबीसी, भटके विमुक्त व मुस्लिम ओबीसी समाज बांधवांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे यासाठी अनेक गावात बैठका घेऊन जनजागृती करण्यात आली आहे. ड.सुभाष भाऊ राऊत, सुघोष मुंढे, परमेश्वर महाराज वाघमोडे, बापू गाडेकर, राजेंद्र विटकर, किशोर चौधरी आदींच्या उपस्थितीत घेण्यात आलेल्या बैठकांना त्या - त्या गावातील ओबीसी समाज बांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन

## ओबीसी समाजाच्या...

आ. गोपीचंद पडळकर, मुस्लिम समाजाचे नेते शब्बीर अन्सारी, प्रा. लक्ष्मण हाके, ज्येष्ठ साहित्यिक तथा भटक्या विमुक्त समाजाचे नेते लक्ष्मणराव गायकवाड, शिवा संघटनेचे संस्थापक प्रा. मनोहर धोंडे, सयाजी झुंजार, राजाराम पाटील, नवनाथ वाघमारे, ड. मंगेश ससाने, वंजारी समाजाचे नेते सत्संग मुंडे, ईश्वर बाळबुधे आदींची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. ओबीसी आरक्षण अखंडित राहावे, ओबीसींच्या लेकरांना आरक्षणाचा लाभ मिळावा, ओबीसी समाजातील लेकरांच्या भवितव्यासाठी आणि ओबीसी समाजाच्या न्याय हक्काच्या मागणीसाठी सदरील महाएल्गार सभा होणार असून या सभेला ओबीसी समाजातील बंधू-भगिनीसह समाज बांधवांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन समता परिषदेचे बीड शहराध्यक्ष निखिल शिंदे यांनी केले आहे.

## माजलगावच्या श्रीहरीची ....

श्रीहरीने तो आपल्या परिश्रम, शिस्त आणि निष्ठेच्या बळावर मिळवला आहे. श्रीहरीचं बालपण अत्यंत सामान्य परिस्थितीत गेलं. त्याने इयत्ता १० वी पर्यंतचे शिक्षण श्री सिध्देश्वर विद्यालय माजलगाव येथे केले व उर्वरित

◆ पान ४ वरून पुढे...

शिक्षण बंगलोर येथे केले. त्यांचे वडील वारकरी संप्रदायाशी जोडलेले असून त्यांनी भक्ती, प्रामाणिकपणा आणि संयम या संस्कारांनी कुटुंबाची जडण घडण केली. आर्थिक परिस्थिती आव्हानात्मक असतानाही श्रीहरीने हार मानली नाही; उलट प्रत्येक अडचणीला संधी मानून आपला मार्ग स्वतः घडवला. श्रीहरीचे दोन्ही बंधू आपल्या कार्यातून समाजात प्रेरणा निर्माण करत आहेत. एक भाऊ चैतन्य माजलगाव येथे संगीत शिक्षक म्हणून कार्यरत असून, दुसरे भाऊ सच्चिदानंद शिवचरित्र व्याख्याते म्हणून शिवरायांचे विचार लोकांपर्यंत पोहोचवतात. श्रीहरीला या दोन्ही बंधूंचे अतिशय मोलाचे मार्गदर्शन लाभल्यानेच त्याला यशाचे शिखर गाठता आले. अशा साध्या, धार्मिक आणि संस्कारी कुटुंबात वाढलेल्या श्रीहरीने मिळवलेलं हे यश म्हणजेच संघर्षातून अवकाशाला गवसणी घातली आहे.

## माजलगाव विकास...

फराळ साहित्य वाटपासोबतच मोफत दंत चिकित्सा शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात एकूण २०१ विद्यार्थ्यांची दंत तपासणी करण्यात आली. सविस्तर वृत्त असे की, माजलगाव प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सौ. मंगलाताई सोळंके आणि सचिव नीला देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली माजलगाव विकास प्रतिष्ठान शैक्षणिक साहित्य वाटप, शैक्षणिक सहली, किशोरवयीन मुलांसाठी कार्यशाळा, महिला मेळावा आणि आरोग्य शिबिर यासारखे विविध उपक्रम राबवत आहे. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पुजनाने झाली. उपस्थित मान्यवरांचे मोगऱ्याचे रोपटे व शाल देऊन स्वागत करण्यात आले. लाभार्थी विद्यार्थिनी ऋतुजा आरगडे हिने या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले. सिंदफणा पब्लिक स्कूलच्या नृत्य शिक्षिका रेखा होके यांनी मुलांच्या दातांच्या स्वच्छतेसाठी वडिलांच्या स्मृतीप्रित्यर्थ मोफत टूथब्रश वाटप केले.

## रखडलेल्या पीक....

सुव्यवस्थेचा काही प्रश्न निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा चौसाळा व क्षेत्रीय कार्यालय बीड यांची राहील असे निवेदन बाळासाहेब मोरे पाटील यांनी दिलेले आहे. अगोदरच अतिवृष्टीच्या दुष्टचक्रात शेतकरी पूर्णपणे खचलेला असून बँकेच्या मनमानी कारभारामुळे शेतकऱ्यांना बँकेत वारंवार हेलपाटे मारावे लागत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही वायाला जात आहेत. तसेच सध्या पिकांच्या काढणीचे दिवस असल्याने शेतकऱ्यांच्या शेतातील कामही बुडत आहे. आता तरी बँक प्रशासनाने मनमानी कारभार थांबवून शेतकऱ्यांना तात्काळ पीक कर्ज उपलब्ध करून द्यावे. म्हणजे किमान त्यांना आता रब्बीच्या पेरणीसाठी तरी हे पीक कर्ज उपयोगी येईल असे प्रसार माध्यमांना प्रसिद्ध दिलेल्या पत्रकात अविनाश उर्फ बाळासाहेब मोरे पाटील यांनी सांगितले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# सहकारी मजूर संस्था उपाशी : अधिकारी तुपाशी!

## सुशिक्षित बेरोजगार अभियंते व मजूर संस्थांवर उपासमारीची वेळ ; जिल्हा नियोजन अधिकाऱ्याची तात्काळ बदली करा : सय्यद सलीम बापू

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील मजूर संस्था आणि सुशिक्षित बेरोजगार अभियंते उपाशी, पण अधिकारी मात्र तुपाशी! अशा शब्दांत आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी जिल्हा नियोजन अधिकारी यांच्यावर घणाघाती टीका केली आहे. मोठ्या गुत्तेदारांना प्राधान्य देऊन कामे वाटप केली जात असल्याने स्थानिक मजूर संस्था आणि बेरोजगार अभियंत्यांवर उपासमारीची वेळ आली असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.

सलीम बापू यांनी सांगितले की, महाराष्ट्र शासनाचे राजपत्र क्र. सीएटी-२०२३/प्र.क्र.१४४/इमा-२ नुसार सहकारी मजूर संस्था आणि सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना डी.पी.डी.टी.सी, मंत्री फंड,आमदार फंड,खासदार फंड, पंचायत समिती, नगरपरिषद, ग्रामपंचायत, सार्वजनिक बांधकाम, पाटबंधारे, जिल्हा परिषद आदी विभागांमधील कामे प्राधान्याने देण्याचे आदेश आहेत. परंतु, या आदेशाकडे जिल्हा नियोजन अधिकारी कार्यालयाकडून उघडपणे दुर्लक्ष करण्यात येत असून, मोठ्या गुत्तेदारांना कामे देऊन स्थानिक संस्थांना वंचित ठेवले जात आहे.

बीड जिल्ह्यातील शेकडो उच्चशिक्षित बेरोजगार अभियंते आणि ४१६ सहकारी मजूर संस्था शासनाच्या या अन्यायकारक धोरणामुळे आर्थिक संकटात सापडल्या आहेत.अनेक अभियंते आपला उदरनिर्वाह करण्यासाठी मजुरी किंवा इतर किरकोळ कामांवर अवलंबून आहेत. शासन आदेश असूनही त्याची अंमलबजावणी न करणे म्हणजे बेरोजगारांच्या आयुष्याशी केलेला अन्याय आहे, तरी सदरील प्रकरणी आंबेडकरी विचार मोर्चाच्या वतीने वेळोवेळी शासन दरबारी निवेदन देऊन मागणी केली आहे. असे सलीम बापू यांनी स्पष्ट केले.

या प्रकरणातील निष्काळजीपणाबद्दल जबाबदार जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांची तात्काळ बदली करण्याची मागणी सलीम बापू लवकरच जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे करणार आहे. त्याचप्रमाणे मा.जिल्हाधिकारी साहेब व पालकमंत्री साहेबांनी या प्रकरणावर जातीने लक्ष देऊन शासन आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करून सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना आणि मजूर संस्थांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणावे, अशी ठाम मागणी सय्यद सलीम बापू यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली आहे. जर शासनाने या अन्यायाविरुद्ध तात्काळ निर्णय घेतला नाही, तर मजूर संस्था आणि सुशिक्षित बेरोजगार अभियंते एकत्र येऊन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करतील, असा इशाराही आंबेडकरी विचार मोर्चात आंबेडकर रिपब्लिकन मोर्चा चे मराठवाडा अध्यक्ष सलीम बापू यांनी प्रसिद्धी माध्यमांना दिलेल्या पत्रकातून दिला आहे.

# प्रा.आ.केंद्र चऱ्हाटा येथे पदोन्नतीने आरोग्य सहाय्यक पदी नियुक्ती

**बीड । प्रतिनिधी**

मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेश जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या समुपदेशन पद्धतीने आरोग्य सेवक यांचे पदोन्नती करण्यात आले. गुरुवार रोजी पदोन्नती ने आरोग्य सहाय्यक पदी निवड झाली म्हणून प्रा आ केंद्र चऱ्हाटा च्या वतीने वैद्यकीय अधिकारी डॉ मदन काकड , डॉ संजना गोपवाड मॅडम , सामुदाय आरोग्य अधिकारी डॉ श्रीमती शारदा सारंग , श्री सर्जेराव गव्हाणे , श्री जयदिप उबाळे , श्रीमती




सुनिता शेलार , तसेच कर्मचारी वर्ग श्री.गणेश शिंदे , श्री.किशोर जाधव ,श्री बाळासाहेब मार्कंड, श्री.महेश राहींज , श्री.योगेश नेटके , श्री.रोहीत घोगरे ,श्री. मावली थोरात , श्री.अशोक उबाळे , श्री. आच्युत उबाळे , तसेच श्रीमती मिरा तांदळे , श्रीमती लक्ष्मी डिगे , श्रीमती यासमीन मोमिन , शांतादेवी गुजर , श्रीमती,पार्वती देवळकर , श्रीमती, सिमा राजवण , श्रीमती दिक्षा घरत , श्रीमती दिपाली उबाळे आदी ने नितीन महुवाले यांचा हुदय सत्कार पण त्यांना पुढील कामासाठी इच्छा दिल्या व शेवटी आभार महुवाले यांनी मानले.

# प्रमिलादेवी पाटील महाविद्यालय, नेकनूर येथे वाचन प्रेरणा दिन साजरा

**नेकनूर । प्रतिनिधी**

भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीचे औचित्य साधून ग्रंथालय विभागा अंतर्गत वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ढास डी. के.हे होते कार्यक्रमाची सुरुवात डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून करण्यात आली. या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. बचुटे जी. डी. हे होते उपस्थितांना मार्गदर्शन करतांना डॉ.



ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवन प्रवास त्यांचे दैनंदिन कार्य दैनिक वर्तमानपत्र वाटप करण्याचे कार्य ते देशाचे नेतृत्व तसेच त्यांनी प्रकाशित केलेले अग्निपंख इत्यादी बाबीवर सखोल असे मार्गदर्शन केले प्राचार्य डॉ. ढास डी. के यांनी वाचन प्रेरणा दिनाचे महत्व विषद केले माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा शिक्षक ते शास्त्रज्ञ जीवनप्रवास हा सर्वांसाठी प्रेरणादायी होता हे विविध अंगाने सोदाहरणासह स्पष्ट केले ,वाचन मानवी विकासासाठी अत्यंत महत्वाचे आहे वाचलेले पेरणे आणि पेरलेले उगविणे व ते आपल्या कृतीतून, भाषा , नेतृत्व व लिखाणातून दिसले पाहिजे, पारंपारिक वाचन सवयीची आठवण करून देत असताना आज मात्र शिक्षण पद्धती मध्ये झालेले बदल चार भितीच्या पलिकडे जाऊन शिक्षण घेणे बंधनकारक झाले आहे तसेच वाचनाचे आयाम ही बदलले आहेत , बदलत्या प्रवाहा नुसार बदलने गरजेचे आहे,इत्यादी विषयी सखोल असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची प्रस्ताविक करत असताना ग्रंथपाल डॉ.ज्योती मगर वाचन प्रेरणा दिनाचे महत्त्व या दिनाच्या औचित्य लक्षात घेऊन, घेण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या उपक्रमाची माहिती दिली.

## राजमाता जिजाऊ महाविद्यालयाचा ज्ञानेश्वर सचिन नायकोडे जिल्हास्तरीय ३000 मीटर धावणे स्पर्धेत द्वितीय

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**



बीड प्रतिनिधी: मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयाचा विद्यार्थी चि. ज्ञानेश्वर सचिन नायकोडे याने बीड जिल्हा परिषद क्रीडा विभाग आयोजित जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा ३००० मीटर धावणे स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला.याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, क्रीडा शिक्षक प्रा. अशोक शिनगारे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# संरक्षणमंत्र्यांनी नाशिकमध्ये एचएएलच्या स्मार्ट टाऊनशिपचे केले अनावरण

**नाशिक । प्रतिनिधी**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज नाशिकमध्ये एचएएलच्या स्मार्ट टाउनशिपचे अनावरण केले, ज्यामध्ये हरित तंत्रज्ञान, डिजिटल पायाभूत सुविधा आणि समुदाय-केंद्रित सुविधांचा समावेश आहे. कार्यक्रमादरम्यान एचएएलचे सीएमडी डॉ. डी के सुनील, संचालक, सीईओ आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

एचएएलचे सीएमडी डॉ. डी के सुनील म्हणाले, एचएएलचा प्रमुख उपक्रम, स्मार्ट टाउनशिप,



त्याच्या रहिवाशांच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी आणि संसाधन कार्यक्षमता आणि पर्यावरणीय व्यवस्थापनात नवीन मानके स्थापित करण्यासाठी डिझाईन केलेले आधुनिक, शाश्वत आणि तांत्रिकदृष्ट्या प्रगत शहरी निवासस्थान तयार करणे आहे.

हा प्रकल्प भविष्यातील टाउनशिप विकासासाठी मॉडेल केला गेला आहे, ज्यामुळे शाश्वत विकास आणि स्मार्ट शहरीकरणाच्या व्यापक उद्दिष्टांमध्ये अर्थपूर्ण योगदान मिळेल.

## ३ डिसेंबर रोजी राज्यातील १0,000 पत्रकारांची आरोग्य तपासणी करणार :एस.एम.देशमुख

**मुंबई । प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वर्धापन दिनी म्हणजे ३ डिसेंबर २०२५ रोजी राज्यातील १०,००० पत्रकारांची आरोग्य तपासणी करण्याचा संकल्प परिषदेने सोडला आहे.. एकाच दिवशी एवढ्या मोठ्या संख्येत पत्रकारांची आरोग्य तपासणी करण्याचा हा विश्व विक्रम असणार आहे असा दावा एस.एम.देशमुख यांनी केला आहे. ३ डिसेंबर १९३९ रोजी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेची स्थापन झाली.. गेली दहा वर्षे ३ डिसेंबर हा दिवस राज्यात पत्रकार आरोग्य तपासणी दिन म्हणून पाळला जातो.. पहिल्या वर्षी ३००० पत्रकारांची आरोग्य तपासणी केली गेली..त्यानंतर ही संख्या क्रमश: वाढत गेली.. गेल्यावर्षी ८००० पत्रकारांची तपासणी केली गेली.. वाढता प्रतिसाद पाहून यावर्षी १०,००० पत्रकारांच्या आरोग्य तपासणीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. परिषदेशी संलग्न जिल्हा आणि तालुका पत्रकार संघांनी स्थानिक स्वयंसेवी संस्था आणि डॉक्टरांच्या मदतीने पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबियांची आरोग्य तपासणी शिबिरं घ्यावीत असं आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर,

# महिलांना न्याय देण्यासाठी आयोग कटिबद्ध – महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर

**सातारा । प्रतिनिधी**

महिलांचे प्रश्न असंख्य आहेत. समाजाची मानसिकता बदलण्यासाठी सातततत्यपूर्ण प्रयत्नांची आवश्यकता आहे. त्यासाठीची लढाई खूप मोठी आणि प्रदीर्घ आहे. ही लढाई लढण्यासाठी समाजातील सर्व घटकांचा, सर्व यंत्रणांचा सहभाग आवश्यक आहे. महिलांना न्याय देण्यासाठी महिलांच्या समस्या जाणून घेवून त्यांना न्याय देण्यासाठी राज्य महिला आयोग कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन



राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती रुपाली चाकणकर यांनी केले. महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडून ‘महिला आयोग आपल्या दारी’ या उपक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात जनसुनावनी घेण्यात आली. या जनसुनावणीच्या उद्घाटन कार्यक्रमामध्ये मार्गदर्शन करताना आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर बोलत होत्या. यावेळी खासदार नितीन पाटील, जिल्हाधिकारी संतोष पाटील, पोलीस अधिक्षक तुषार दोषी, राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव निना बेदरकर, ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक विश्वास सिध्द, जिल्हा महिला बाल विकास अधिकारी शिल्पा पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. महिलांची सुरक्षितता आणि संरक्षण करुन त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी राज्य महिला आयोग कटीबद्ध असल्याचे सांगून रुपाली चाकणकर म्हणाल्या, महिलांच्या संरक्षणासाठी शासनाने अनेक कठोर कायदे केले आहेत. हुंडा प्रतिबंधक कायदा, बालविवाह प्रतिबंधक कायदा, गर्भलिंग निदान चाचणी प्रतिबंध कायदा, कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळ कायदा असे अनेक कायदे महिलांच्या संरक्षणासाठी केले आहेत.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी आवश्यक मनुष्यबळाची उपलब्धता करावी – राज्य निवडणूक आयुक्त

**मुंबई । प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची आवश्यकता असून, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ते प्राधान्याने उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तयारीसंदर्भात आयोगाच्या कार्यालयात दिनेश वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते. मुख्य सचिव राजेश कुमार, आयोगाचे सचिव सुरेश काकाणी, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. के. एच. गोविंदराज, वित्त विभागाचे प्रधान सचिव सौरव विजय, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, गृहविभागाचे प्रधान सचिव अनुपकुमार सिंग, मुंबईचे पोलिस आयुक्त देवेन भारती, विशेष पोलिस महानिरीक्षक मनोजकुमार शर्मा, आदी यावेळी उपस्थित होते. दिनेश वाघमारे यांनी सांगितले की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी आणि इतरही कर्मचाऱ्यांची उपलब्धता महत्वाची आहे. त्याचबरोबर राज्य निवडणूक आयोगातही काही जागा रिक्त आहेत. एकूण मनुष्यबळाच्या उपलब्धतेबाबत संबंधित विभागांना अवगत करण्यात यावे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. गरजेनुसार भरारी पथके, चेकपोस्ट, तक्रार निवारण केंद्र इत्यादींची व्यवस्था करावी. सर्व ठिकाणी पुरेसा पोलीस बंदोबस्त असावा. आचारसंहितेच्या प्रभावी अंमबजावणीच्या दृष्टीने संपूर्ण यंत्रणेने सजग राहणे आवश्यक आहे. कुठेही अनुचित प्रकार घडणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी, असेही वाघमारे यांनी सांगितले.

# ‘मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा’ अभियानाचा तिसरा टप्पा 3 नोव्हेंबरपासून

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील सर्व व्यवस्थापनांच्या व सर्व माध्यमांच्या शाळांसाठी ‘मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा’ अभियानाच्या तिसऱ्या टप्प्यास शासनाने मान्यता दिली असून ३ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत हे अभियान राबविण्यात येणार आहे. २०२५-२६ मध्ये हे स्पर्धात्मक अभियान काही नवीन उपक्रमांसह राबविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. या अभियानामध्ये विविध स्तर आणि वर्गवारीमध्ये विजेत्या शाळांना एकूण ७२ कोटी २२ लाख रुपयांची पारितोषिके दिली जाणार आहेत. अभियानाची व्याप्ती- या अभियानासाठी शाळांची विभागणी (अ) शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा आणि (ब) उर्वरित इतर सर्व व्यवस्थापनांच्या शाळा अशा दोन वर्गवारीत करण्यात येत आहे. प्रत्येक स्तरावरील विजेता या दोन्ही वर्गवारीसाठी स्वतंत्रपणे निवडण्यात येईल. हे अभियान बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्र, वर्ग ‘अ’ आणि वर्ग ‘ब’ च्या महानगरपालिकांचे कार्यक्षेत्र तसेच उर्वरित महाराष्ट्र अशा स्तरांवर राबविण्यात येईल.

अभियानाची उद्दिष्टे- शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण, क्रीडा इत्यादी घटकांबाबत जागृती करून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासास चालना देणे, शासनाच्या ध्येय धोरणाशी सुसंगत अशा शालेय प्रशासनाच्या बळकटीकरणास चालना देणे तसेच शालेय शिक्षणाच्या दृष्टिकोनातून सर्वाधिक महत्त्वपूर्ण असलेल्या शैक्षणिक संपादणूक या घटकाच्या वृद्धीस प्रोत्साहन देणे ही या अभियानाची उद्दिष्टे आहेत. अभियानाचा कालावधी- या अभियानाच्या पूर्वतयारीसाठी २४ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२५ हा कालावधी असेल. ३ नोव्हेंबर रोजी औपचारिक कार्यक्रमाद्वारे अभियानाची सुरुवात होईल. तर, ३१ डिसेंबर २०२५ रोजी अभियानाचा कालावधी पूर्ण होईल. १ जानेवारी २०२६ ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत मूल्यांकनाची प्रक्रिया पार पाडण्यात येणार असून त्यानंतर अभियानाचा राज्यस्तरीय पारितोषिक वितरण समारंभ होईल. अभियानाचे स्वरूप- अभियानात सहभागी होऊन स्पर्धा करणाऱ्या शाळांना पायाभूत सुविधा- ३८ गुण, शासन ध्येय धोरण अंमलबजावणीसाठी- १०१ गुण आणि शैक्षणिक संपादणूकसाठी- ६१ गुण असे एकूण २०० गुण असतील.

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: ८४२ / २०२५**

**मंगल शिवाजी जाधव – विरूध्द– निरंक**

ज्याअर्थी मयत नामे शिवाजी संदीपान जाधव हे दिनांक १४.०८.२०२५ रोजी गढी ता. गेवराई जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार– १. श्रीमती मंगल शिवाजी जाधव, वय ४० वर्षे धंदा – घरकाम रा. गढी ता. गेवराई जि. बीड, २. संकेत शिवाजी जाधव , वय २३ वर्षे धंदा – मजुरी, रा. सदर ३. प्रतिक्षा शिवाजी जाधव, वय २६ वर्षे धंदा – घरकाम, रा. सदर

गैरअर्जदार – १. निरंक

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार व गैरअर्जदार यांना सदर मयत नामे शिवाजी संदीपान जाधव, गढी ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख : २०.११.२०२५

(मार्फत ॲड. जोशी आर ए )

आदेशावरून (स्वाक्षरीत)

शिक्का | (स्वाक्षरीत) क. लिपीक | सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ८३७/२०२५**

**कान्हु पि. उत्तम करचुंडे व इतर**

याअर्थी मयत दगडाबाई भ्र. उत्तम करचुंडे, रा. राजापुर ता. गेवराई जि. बीड हे / हया दिनांक ०८/०१/२०२० रोजी मौजे नानगाव (गणेश रोड), ता. दौंड जि. पुणे येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क. १ कान्हु पि. उत्तम करचुंडे वय ३३ वर्षे, धंदा शेती रा. राजापुर ता. गेवराई जि. बीड ह. मु. भारत नगर-२, कुली कॅम्प उल्हासनगर, ४ ता. शेती, रा. राजापुर जि. ठाणे अर्जदार क. २ उत्तम पि. दगडु करचुंडे, वय ६७ वर्षे, धंदा ता. गेवराई जि. बीड यांनी शासकीय/ निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत दगडाबाई भ्र. उत्तम करचुंडे, रा. राजापुर ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक /१०/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख :- २४/११/२०२५

( मार्फत ॲड. पी. एम. पटेकर, गेवराई)

आदेशावरून (स्वाक्षरीत)

शिक्का | (स्वाक्षरीत) क. लिपीक | सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • शुक्रवार, दि. १७ ऑक्टोबर २०२५ • पान ४

## माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या वतीने ३५७ विद्यार्थ्यांना दिवाळी फराळ साहित्य वाटप

### गरजु विद्यार्थ्यांचे मोफत दंत तपासणी शिबिर संपन्न



**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील गेल्या २३ वर्षांपासून निराधार विद्यार्थ्यांसाठी समाजसेवेचा ध्यास घेऊन कार्यरत असलेल्या माजलगाव विकास प्रतिष्ठानने यंदाही दिवाळी निमित्त गरजू विद्यार्थ्यांना फराळ साहित्याचे मोठ्या प्रमाणावर वाटप केले. बुधवार, १५ ऑक्टोबर २०२५ रोजी लोकनेते सुंदरराव सोळंके नागरी सहकारी पतसंस्था, माजलगाव येथे आयोजित या कार्यक्रमात म ाजलगाव तालुक्यातील २५० आणि धारूर तालुक्यातील १०७ अशा एकूण ३५७ विद्यार्थ्यांना दिवाळीच्या फराळ साहित्याचे वाटप करण्यात आले. सिंदफणा पब्लिक स्कूल माजलगाव आणि लोकनेते सुंदरराव सोळंके नागरी सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमात आधार प्रकल्पांतर्गत निराधार विद्यार्थ्यांना ▶▶ उर्वरित पान २ वर

## हरवलेल्या व्यक्तीबाबत निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

परळी शहर पोलीस स्टेशन गुरनं २५५/२०२५ कलम १३७ (२) बी.एन.एस. अन्वये दिनाक ७/१०/२०२५ रोजी गुन्हा दाखल झाला आहे. मुलगा अभिषेक व्यंकटी सिरसाट, वय १५ वर्षे रा. लिंबवाडी ता.चाकूर.जिल्हा लातूर, हरवण्याचे ठिकाण मातोश्री चंद्रभागा आश्रम, परळी वै. जि. बीड हरवण्याचा दि. ५ ऑक्टोबर २०२५ रोजी मातोश्री चंद्रभागा आश्रम परळी वैद्यानाथ येथुन १२. ३० वाजेपासून दुकानातून साम ान घेवून येतो असे सांगून मातोश्री चंद्रभागा आश्रम हनूमान नगर परळी वै. येथून निघून गेला आहे ता आद्यापपर्यंत आश्रमात तसेच त्याच्यां घरी परत आलेला नाही. सदर मुलाचे वर्णन पुढीलप्रमाणे. नाव- अभिषेक व्यंकटी सिरसाट, वय १५ वर्षे रा. लिंबवाडी, उंची अंदाजे ४ फुट,रंग गोरा,केस काळे, बांधा सडपातळ, वेशभुषा काळया रंगाचा शर्ट व ग्रे रंगाची जीन्स पॅन्ट या वर्णनाचा मुलगा आढळून आल्यास , पत्ता- रा. लिंबवाडी,ता. चाकूर, जि.जिल्हा लातूर. प्रभारी अधिकारी परळी शहर- जिल्हा बीड मो. क्र. ९२२५०९२८२५, पोलीस उपनिरिक्षक अमोल शिंगणे मो. क्र. ८२७५३३०९७९ आणि नियंत्रण कक्ष,पो.अ. कार्यालय बीड दुरध्वनी क्रम ांक (०२४४२) २२२३३३ यावर संपर्क साधावा असे प्रसिध्दीस दिलेल्या वृतात नमूद केले आहे.

## पाटोदा विद्यालयाच्या अजय बहीरवाळचे राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत यश




**नवगण राजुरी । प्रतिनिधी**

नेवासा जि. अहिल्यानगर येथे नुकत्याच संपन्न झालेल्या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत पाटोदा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या अजय बहीरवाळने द्वितीय क्रमांक पटकावला आहे. नेवासा जि. अहिल्यानगर येथे नुकत्याच संपन्न झालेल्या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत ५७ किलो वजन गटात पाटोदा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पाटोदा (बे.) च्या बहिरवाळ अजय गिताजी या खेळाडूने द्वितीय क्रमांक मिळवून घवघवीत यश मिळविले आहे. त्याला क्रिडाशिक्षक वाघमारे यांचे मार्गदर्शन लाभले. बहीरवाळने मिळालेल्या यशाबद्दल त्याचे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, सहाय्यक प्रशासन अधिकारी योगेश पवार, कार्यवाहक एम. ए. राऊत, पाटोदा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य धनवंत मस्के, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

## रखडलेल्या पीक कर्जासाठी चौसाळा येथील स्टेट बँकेच्या शाखेसमोर अमरण उपोषण करणार : बाळासाहेब मोरे पाटील



**बीड । प्रतिनिधी**

चौसाळा येथील स्टेट बँक ऑफ इंडिया च्या शाखेमध्ये चौसाळा परिसरातील शेतकऱ्यांनी सर्व कागदपत्रांची पूर्तता करून खरीपाच्या पिकासाठी पीक कर्जाची मागणी केलेली आहे. परंतु सध्या खरिपाच्या पिकांची काढणी झाली तरी शेकडो शेतकऱ्यांना पिक कर्ज मिळालेले नसून पीक कर्जासाठी टाळाटाळ सुरू आहे. त्यामुळे अद्याप पर्यंत शेकडो शेतकरी पीक कर्जापासून वंचित आहेत. तसेच बँकेच्या मनमानी कारभाराचा निषेध व्यक्त करण्यासाठी २९ ऑक्टोबर बुधवार रोजी रोजी चौसाळा शाखेसमोर बेमुदत अमरण उपोषण करण्यात येणार असल्याचे अविनाश उर्फ बाळासाहेब मोरे पाटील यांनी जिल्हाधिकारी बीड, स्टेट बँक ऑफ इंडिया मुख्य शाखा बीड, जिल्हा अग्रणी बँक बीड यांना याबाबत लेखी निवेदन दिले आहे. पीक कर्जाची मागणी केलेल्या शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत लाभ मिळेपर्यंत उपोषण सुरू ठेवण्यात येईल व यावेळी कायदा ▶▶ उर्वरित पान २ वर

## बालरंगभुमी परिषद शाखा बीडच्या वतीने एक आगळी वेगळी दिवाळी पहाट चे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

येथील बालरंगभूमी शाखा बीडच्या वतीने दिपावली निमित्त शनिवार दि. १८ नोव्हेंबर २०२५ रोजी धनत्रयोदशीच्या दिवशी सकाळी ठिक ०८.०० वा. शहरातील बालकलावंताची सुरमयी दिवाळी पहाट संपन्न होणार आहे. गायन वादन या माध्यमातून बालकलाकार ही सुरमयी पहाट उजळून टाकणार आहेत तरी या कार्यक्रमासाठी शहरातील रसिकांनी अवश्य यावे असे आवाहन बालरंगभूमी परिषद शाखा बीडच्या अध्यक्षा डॉ. दिपाताई क्षीरसागर यांनी केले आहे.

# अखेर भीती खरी ठरलीच : पात्रुड-लऊळ रस्त्यावर अपघातात एका महिलेचा मृत्यू

## खासदार, आमदार साहेब तुम्ही दोघे त्या कुटुंबाची जबाबदारी घेणार का?

**पात्रुड । प्रतिनिधी**



पात्रुड-लऊळ या अवघ्या चार किलोमीटरच्या रस्त्यावरील खड्डे अखेर एका निष्पाप जीवाचे बळी ठरले. रविवारी सकाळी दुचाकीवरून जात असताना रस्त्यातील खोल खड्ड्यात तोल गेल्याने झालेल्या भीषण अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला. काही दिवसांपूर्वीच या रस्त्याच्या दयनीय अवस्थेबाबत वृत्तपत्रातून इशारा देण्यात आला होता, परंतु प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी त्याकडे दुर्लक्ष केल्याने अखेर भीती खरी ठरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मयत ह्या पात्रुड गावच्या महिला रहिवासी असून रोजच्या प्रमाणे त्या आपल्या कामासाठी दुचाकीवरून निघाल्या होत्या रस्त्यातील खोल खड्डा चुकवताना दुचाकीस्वराचा तोल गेल्याने त्या खाली पडला आणि गंभीर जखमी होऊन कोमात गेल्या; स्थानिक नागरिकांनी तातडीने त्याना उपचारासाठी रुग्णालयात घेऊन गेले परंतु तोपर्यंत त्या कोमामध्ये गेल्या उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

पात्रुड-लऊळ हा रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून दुर्लक्षित आहे. पावसाळ्यानंतर रस्त्याची अवस्था अधिकच बिकट झाली असून वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. काही दिवसांपूर्वी या रस्त्याबाबत प्रवाशांचा कर्दनकाळ ठरत असलेला मार्ग अशी बातमी स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्या वेळी नागरिकांनी प्रशासनास तसेच जनप्रतिनिधींना वेळेत उपाययोजना करण्याचे आवाहन केले होते, पण कुणीच दखल ▶▶ उर्वरित पान २ वर

## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते अमृत दुर्गोत्सव २०२५ चा शुभारंभ

### महाराष्ट्रात अमृततर्फे दीपावलीमध्ये होणार विश्वविक्रमी दुर्गोत्सव

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे यांच्या वतीने राज्यभर दुर्गोत्सव २०२५ या भव्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, या उपक्रमाचा बीड जिल्हा स्तरावरील शुभारंभ जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते आज संपन्न झाला. या प्रसंगी अमृत संस्थेचे जिल्हा व्यवस्थापक विशाल जोशी उपस्थित होते. या उपक्रमाचा प्रमुख उद्देश म्हणजे महाराष्ट्रातील नागरिकांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांविषयी अभिमानाची भावना वृद्धिंगत करणे आणि युनेस्कोने नुकतेच जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट केलेल्या १२ ऐतिहासिक गड-दुर्गांच्या माध्यमातून स्वराज्याची परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे हा आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी शुभारंभ प्रसंगी नागरिकांना आवाहन केले की, सीं; बीड जिल्ह्यातील नागरिकांनी आपल्या ▶▶ उर्वरित पान २ वर

**दुर्गोत्सव २०२५ – उपक्रमाचे वैशिष्ट्ये :**

**अमृत संस्थेच्या वतीने या राज्यव्यापी उपक्रमांतर्गत नागरिकांना आवाहन करण्यात येते की त्यांनी आपल्या घरात,शाळा, कार्यालय किंवा सार्वजनिक ठिकाणी महाराष्ट्रातील १२ गड-दुर्गांपैकी कोणत्याही एका दुर्गाची प्रतिकृती तयार करावी आणि त्या प्रतिकृतीसह घेतलेला सेल्फी्‌.वींर्सेीरीं.लो या संकेतस्थळावर अपलोड करावा.**

## जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हयात कायदा व सुव्यस्थेबाबत आगामी काळात दि. १५ ऑक्टोबर रोजी राष्ट्र परिवर्तन मोर्चा व राज्य परिवहन महामंडळ बीड यांचा मुंबई येथे होणा-या आत्मक्लेश आंदोलनास पाठींबा तसेच आरक्षणाच्या अनुषंगाने विविध संघटनाकडून मोर्चा, सभा आयोजित करण्यात येत आहे. आगामी काळात दिवाळी सण साजरा होणार आहे. तसेच राजकिय पक्ष संघटनेच्या वतीने न्याय मागण्यासाठी विविध प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. यामूळे अचानक घडणा-या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे. दिनांक १५ आक्टोबर २०२५ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दि. २९ ऑक्टोबर २०२५ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास ▶▶ उर्वरित पान २ वर

# लाखो ओबीसी बांधवांच्या उपस्थितीत होणाऱ्या महाएल्गार सभेत ना. भुजबळांची तोफ धडाडणार!

## ओबीसी आरक्षणासाठी ना. भुजबळ आणि आ. मुंडे पहिल्यांदाच एका व्यासपीठावर येणार!

### ओबीसी समाजाची अस्मिता आणि अस्तित्व टिकविण्यासाठी लाखोंच्या संख्येने उपस्थित रहा : सुभाष राऊत

**माजलगाव । प्रतिनिधी**

राज्यातील करोडो ओबीसी व भटके विमुक्तांना मिळालेले सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील संविधानिक आरक्षण आज खऱ्या अर्थाने धोक्यात आले आहे, या आरक्षणावर अनेक मार्गाने अतिक्रमण करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न काही लोकांकडून होत असल्याचे विदारक चित्र सध्या महाराष्ट्रात पाहायला मिळत आहे. हे चित्र बदलण्यासाठी, ओबीसी समाजाची अस्मिता आणि अस्तित्व टिकविण्यासाठी ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते ना. छगनराव भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत आज शुक्रवार ▶▶ उर्वरित पान २ वर

**बीड शहरात पिवळे वादळ धडकणार!**

**आज शुक्रवार रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळ असलेल्या छत्रपती संभाजी राजे क्रीडा संकुलाच्या प्रांगणात ओबीसी महाएल्गार सभा होत असून या सभेसाठी बीड जिल्ह्यासह राज्यातील प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते लाखोच्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. बीड शहर तुमची आमची एकच चळवळ! छगन भुजबळ, छगन भुजबळ! अशा झेंड्यांनी सजले असून आज बीड शहरात पिवळे वादळ धडकणार असल्याचे बोलले जात आहे.**

**महाएल्गार सभेसाठी अॅड. सुभाष राऊत यांचे सुयोग्य नियोजन**



**महाराष्ट्र सरकारने २ सप्टेंबर २०२५ रोजी काढलेला हैदराबाद गॅझेटियरचा जीआर तात्काळ रद्द करावा या प्रमुख मागणीसाठी सदरील महाएल्गार सभा होत असून या सभेचे सुयोग्य नियोजन समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ड. सुभाष राऊत यांच्या संकल्पनेतून करण्यात आलेले आहे. सभेसाठी छत्रपती संभाजी राजे क्रीडा संकुलाच्या प्रांगणात ५० हजार खुर्च्यांचे नियोजन करण्यात आले असून महिलांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. सभेसाठी उपस्थित राहणाऱ्या प्रत्येक ओबीसी बांधवांसाठी नाष्टा, भोजन आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. शेकडो स्वयंसेवक या सभेसाठी स्वयंस्फूर्तीने कार्यरत झाले आहेत.**

## ना.भुजबळांच्या प्रमुख उपस्थितीत आज बीड येथे होणाऱ्या ओबीसी महाएल्गार मेळाव्याला उपस्थित राहण्यासाठी गेवराई तालुक्यातील ओबीसी समाज बांधवांनी कंबर कसली

**तलवाडा । प्रतिनिधी**



सकल ओबीसी व भटके विमुक्त प्रवर्गातील संपुष्टात येत असलेले सामाजिक, शैक्षणिक, नौकरी व राजकीय क्षेत्रातील आरक्षण वाचविण्यासाठी अ.भा.म हात्मा फुले समता परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा देशातील तमाम ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते मा.ना.छगनरावजी भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत आज शुक्रवार दि.१७ ऑक्टोबर रोजी दुपारी ठिक चार वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण बीड याठिकाणी महाएल्गार मेळावा समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा बीड जिल्हाध्यक्ष - अॅड.सुभाषभाऊ राऊत यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आला आहे. या महाएल्गार सभेला मंत्री पंकजाताई मुंडे, माजीमंत्री धनंजय मुंडे, माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर, आ.गोपीचंद पडळकर, मुस्लिम ओबीसी समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष - शब्बीरभाई अन्सारी, प्रकाश अण्णा शेंडगे, लक्ष्मण गायकवाड, कल्याण काका आखाडे, प्रा.लक्ष्मण हाके, नवनाथ आबा वाघमारे, अॅड.मंगेश ससाणे, बापूसाहेब भुजबळ, प्रा.पी.टी. चव्हाण, सत्संग मुंडे आदी ओबीसी नेते आवर्जून उपस्थित राहणार असून या मेळाव्याला जाण्यासाठी ▶▶ उर्वरित पान २ वर

## ओबीसी समाजाच्या अस्मितेसाठी महाएल्गार सभेस बहुसंख्येने उपस्थित रहावे : निखिल शिंदे

**माजलगाव । प्रतिनिधी**

ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते ना. छगनराव भुजबळ यांच्या उपस्थितीत शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ४ : ०० वाजता बीड येथे ओबीसी महाएल्गार सभेचे आयोजन समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ड. सुभाष राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून ओबीसी समाजाच्या अस्मितेसाठी या सभेस ओबीसी समाजातील बंधू - भगिनींसह युवक, युवती आणि विद्यार्थ्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन समता परिषदेचे बीड शहराध्यक्ष निखिल शिंदे यांनी केले आहे. शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ४ : ०० वाजता बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुलाच्या प्रांगणात ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते तथा कॅबिनेट मंत्री ना. छगनराव भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत ही महाएल्गार सभा होणार असून यावप्रसंगी जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे, माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर, धनगर समाजाचे नेते प्रकाश शेंडगे, ▶▶ उर्वरित पान २ वर

# माजलगावच्या श्रीहरीची 'हवाई' झेप!

### ● इंडिगोमध्ये एअरक्राफ्ट इंजिनियर म्हणून आहेर यांचा ठसा

**माजलगाव । प्रतिनिधी**



कोणत्याही क्षेत्रात आज म ाजलगावकर मागे नाहीत. थेट इंडिगो एअरलाईन्समध्ये एअरक्राफ्ट मेन्टेनन्स इंजिनियर म्हणून श्रीहरी गोविंदराव आहेर याने उमटलेला ठसा प्रेरणादायी आहे. दरम्यान, श्रीहरीच्या हवाई झेपेबद्दल कौतुकाचा वर्षाव होत आहे.

माजलगाव शहरातील सामान्य कुटुंबातून आलेला श्रीहरी गोविंदराव आहेर या तरूणाने आपल्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर विमान देखभाल अभियांत्रिकी क्षेत्रात एअरक्राफ्ट मेन्टेनन्स इंजिनियर बनून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. श्रीहरीने असोशिएट टेक्निशियन, ज्युनियर टेक्निशियन, टेक्निशियन अशी सर्व पायरी पार करत अखेर एअरक्राफ्ट मेन्टेनन्स इंजिनियर पदवी प्राप्त केली आहे. बुधवारी दिल्ली येथे झालेल्या पदवी वितरण समारंभ कार्यक्रमात त्याला ही पदवी मिळवून श्रीहरी आहेर या तरूणाने माजलगावचा अभिमान वाढवला आहे. या कामगिरीबद्दल त्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. आपल्या या तेजस्वी प्रवासात त्याला एअरक्राफ्ट क्षेत्रातील प्रतिष्ठित पीयर अवॉर्ड हा सन्मान देखील मिळाला आहे. हा पुरस्कार अत्यंत मेहनती आणि गुणवत्ता सिद्ध करणाऱ्या विद्यार्थ्यांना दिला जातो.

▶▶ उर्वरित पान २ वर